# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### आनंदनगर, ओवळा आणि भाईंदरपाडा येथे नवीन उड्डाणपुल उभारण्याबाबत

**(१) ६०४ (२३-१२-२०१४). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपलिका क्षेत्रातील झपाट्याने विकसित होत असलेल्या घोडबंदर रोडवरील वाहतुक सुरळीत व्हावी यासाठी आनंदनगर, ओवळा आणि भाईंदरपाडा येथे नवीन उड्डाणपुल उभारण्यासाठी एमएमआरडीए स्तरांवर सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) उक्त प्रश्नी आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर मार्गावरील वाहतुकीच्यादृष्टीने महत्वपुर्ण असलेल्या उड्डाणपुलांची कामे लवकरात लवकर पूर्ण व्हावीत याकरीता आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०१५) :**(१), (२) व (३) ठाणे घोडबंदर रस्त्यावरील आनंदनगर, ओवळा व कासारवडवली या तीन जक्शनवर उड्डाणपुल बांधण्याचा सविस्तर प्रस्ताव मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मागणीप्रमाणे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिनांक ०७.०४.२०१५ रोजी सादर केलेला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही मागणीप्रमाणे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून करण्यात येईल.

---

**कल्याण शहरातील वळण रस्ता गोविंदवाडी बायपास प्रकल्पांतर्गत रस्त्याच्या कामाबाबत**

**(२) ४०८२ (२३-१२-२०१४). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण शहरातील वळण रस्ता गोविंदवाडी बायपास प्रकल्पांतर्गत कामाचा कालावधी उलटूनही सदरहू रस्त्याचे काम संथ गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर काम निकृष्ठ दर्जाचे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर प्रकल्पाअंतर्गत येथील नागरिकांचे पुनवर्सन झालेले नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदरहू रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत व तेथील नागरिकांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०१५) :**(१) नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने रस्त्याच्या आखणीतील सर्व अतिक्रमणे निष्कासित करुन अतिक्रमण विरहीत जागा म.रा.र.वि.म. च्या ताब्यात देण्याच्या अटीवर गोविंदवाडी बायपासचे काम म.रा.र.वि.म. ने हाती घेतले होते. परंतु महानगरपालिकेने रस्त्याच्या आखणीवर येणार तबेले न काढल्याने संपूर्ण लांबीत आवश्यक जागा म.रा.र.वि. महामंडळाला उपलब्ध झालेली नाही. तसेच गोविंदवाडी रस्त्यावर नागरीकांच्या मागणीनुसार वाहनांसाठी एक भूयारी मार्ग व एक पादचारी भुयारी मार्ग, संरक्षक भिंत इ. अतिरिक्त कामे म.रा.र.वि. महामंडळाने हाती घेतल्यामुळे कामाच्या वावात बदल झालेला आहे. सदर रस्त्याचे सुमारे ८०% काम पूर्ण झालेले असून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने तबेले निष्कासीत करुन संपूर्ण जागा उपलब्ध करुन दिल्यानंतर उर्वरित काम पूर्ण करण्यात येईल.

(२) अशी वस्तूस्थिती नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) गोविंदवाडी बायपास हा रस्ता कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत असून रस्त्याच्या आखणीतील सर्व अतिक्रमणे निष्कासित करुन अतिक्रमण विरहीत जागा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा अकस्मात**
**मृत्यू झाल्यास मिळणाऱ्या मदतीसंदर्भात**

**(३) ४१९५ (२२-१२-२०१४). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विद्यार्थी यांचा अकस्मात मृत्यू झाल्यास शासनाकडून ७५ हजार रुपये मदत दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:परिस्थिती मध्ये ही मदत अपुरी असल्यामुळे रुपये २ लाख देणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०९-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सानुग्रह अनुदानात रु.७५०००/- वरुन रु.१,५०,०००/- इतकी वाढ करण्याबाबत विभागाने वित्त विभागास प्रस्ताव सादर केलेला असता वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दयांवर आयुक्त, आ.वि. यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत. आयुक्तांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**रत्नागिरी जिल्हयातील पोलीस वसाहतीच्या देखभालीबाबत**

**(४) ६१६५ (१०-०४-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील पोलीस वसाहतीच्या देखभालीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सन २००९ मध्ये २६९ लाखांचे बांधकाम अंदाजपत्रक शासनाला सादर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच वाढीव अंदाजपत्रकासह यावर्षी हा निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास, निर्णयाचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पोलीस वसाहतीची दुरुस्ती लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-१२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य रस्ते विकास महामंडळावर तीन हजार कोटीचे असलेले कर्ज**

**(५) ७३५१ (१५-०५-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य रस्ते विकास महामंडळावर (एमएमआरडीसी) जवळपास तीन हजार कोटीचे कर्ज आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी एमएसआरडीसीने सल्लागाराच्या नियुक्तीसाठी निविदा मागविल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमएसआरडीसी अंतर्गत सुरु असलेले तसेच व्यवहार्य नसलेले प्रकल्प रद्द केले आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोणकोणते प्रकल्प रद्द केले आहेत व कोणकोणत्या प्रकल्पांवर कामे तातडीने होण्यासाठी लक्ष केंद्रीत केले आहेत,
(५) उपरोक्त प्रकल्पांची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) अंशत: खरे आहे.
(४) (अ) जलवाहतुक व मुंबई ट्रांन्स हार्बर लिंक तसेच पश्चिम द्रुतगती मार्ग इत्यादी प्रकल्प रद्द केलेले आहेत.

(ब) महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महामंडळाने विशेष नियोजन प्राधिकरणामार्फत मुंबई पुणे द्रुतगती महामार्गालगतच्या जमीनीचा वाणिज्यिक वापर, नेपीयन्सी रोड व बांन्द्रा येथील भुखंडाचा विकास व वाणिज्यिक वापर, मुंबई पुणे द्रुतगती महामार्गाची क्षमतावाढ आणि मुंबई ते नागपूर द्रुतगती महामार्ग इत्यादी विविध प्रकल्प राबविण्याचे योजले आहे. या प्रकल्पांची अंमलबजावणी झाल्यास महामंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल.
(५) वरील प्रकल्पांसाठी महामंडळास अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नेमण्यासाठीचे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत.

---

## खामगांव ते चिखली (जि.बुलढाणा) हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाचा भाग घोषित करणेबाबत

**(६) ८५०९ (०९-०४-२०१५). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना-बेराळा-चिखली (भाग१) ची संपूर्ण लांबी राष्ट्रीय महामार्गाचा भाग घोषित झाला असल्यामुळे सदर रस्ता केंद्र शासनाचे सडक परिवहन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच जालना-बेराळा-चिखली हा मार्ग खाजगी करणाअंतर्गत करण्यात येणार आहे,हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामधील चिखली ते खामगांव (भाग २) ही लांबी राष्ट्रीय महामार्गाच्या भागामध्ये समाविष्ट करण्याबाबत शासन कारवाई करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१२-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) सदर मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित होणे पूर्वी राज्य शासनातर्फे सदर रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम खाजगीकरणांतर्गत सुरु करण्यात आले. तथापि खाजगीकरणांतर्गत सुरु करण्यात आलेल्या कामाची गती उद्योजकाने योग्य न ठेवल्याने व तदनंतर हे काम त्यांनी

पुर्णपणे बंद केल्याने खाजगीकरणांतर्गत कामाचा करारनामा रद्द करण्याची कार्यवाही योजण्यात आली आहे. सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आल्यामुळे केंद्र शासनाचे धोरणानुसार पुढील कार्यवाही होणे अपेक्षित आहे.
(३) बेराळाफाटा चिखली खामगांव या एकूण ६८.३० कि.मी. लांबीपैकी ७.२० कि.मी. लांबी राष्ट्रीय महामार्ग घोषित केला असून उर्वरित लांबी सुध्दा राष्ट्रीय महामार्ग घोषीत करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आळंदी, देहू ते पंढरपूर (जि.सोलापूर) पालखी महामार्ग रुदीकरणाचे काम रखडले असल्याबाबत**

**(७) ९९७२ (१०-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आळंदी, देहू ते पंढरपूर (जि.सोलापूर) पालखी महामार्ग रुंदीकरणाचे काम प्रलंबित असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी पुढील दोन वर्षात महामार्ग रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय वाहतूक मंत्री यांनी केली असतानाही अद्यापपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे याबाबतचा कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार झाला नसल्याने रस्त्याची केवळ डागडुजी करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे,
(३) असल्यास, सदरहू महामार्ग रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू महामार्ग रुंदीकरणाचे काम केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) आळंदी ते पंढरपूर हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग क्र. ९६५ असा घोषित झाला असून सदर रस्ता सा.बां. विभागाकडून राष्ट्रीय महमार्ग विभागाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) पुणे जिल्हयातील आळंदी ते पंढरपूर पालखी मार्गापैकी हडपसर-सासवड-जेजुरी रस्त्याचे ४१.०६ कि.मी. लांबीचे व लोणंद-फलटण या ५.२० कि.मी. लांबीचे रुंदीकरणाचे काम प्रगतीत आहे.

देहुगांव ते पंढरपूर या श्रीसंत तुकाराम महाराज पालखी हडपसर ते पाटस या रा.म.क्र. ९ वरील ५७.३० कि.मी. लांबीमधील रुंदीकरणाचे काम पूर्ण झालेले आहे.
(४) आंळदी ते पंढरपूर मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून जाहीर झाल्यामुळे सदर रस्त्याचे रुंदीकरण राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत हाती घेणे अपेक्षीत आहे.

---

**खामगांव-जालना महामार्गाच्या चौपदीकरणामध्ये चिखली जिल्हा बुलढाणा येथील शिवाजी उद्यानापासून शिवाजी महाराज पुतळा, बसस्थानक, शिवाजी महाविद्यालय या रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत**

**(८) १०३७१ (१०-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव जालना महामार्गाच्या चौपदरीकरणामध्ये चिखली जिल्हा बुलढाणा येथील शिवाजी उद्यानापासून शिवाजी महाराज पुतळा, बसस्थानक, शिवाजी महाविद्यालय या रस्त्याचे रुंदीकरण या कामाचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच खामगांव जालना महामार्गाचे काम बंद असून शिवाजी उद्यान पासून, शिवाजी महाराज पुतळा बसस्थनक शिवाजी महाविद्यालय या रस्त्याचे रुंदीकरण न झाल्यामुळे नागरिकांची वर्दळ वाहनांची गर्दी रस्त्यावर उभी राहणारी वाहने यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याच्या रुंदीकरणासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१२-२०१५) :**(१) नाही.

चिखली शहरातील शिवाजी महाराज उद्यान ते शिवाजी महाविद्यालय ही लांबी (१३०० मी.) नगरपालिका चाखली यांचे अख्यतारीत आहे. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत खाजगीकरणांतर्गत बेराळा फाटा ते चिखली अडमापुर ते रा.म.क्र. ६ पर्यंतच्या रस्त्याचे चौपदरीकरण करणे. (भाग-२) या प्रकल्पांतर्गत चिखली शहरातील १३०० मी. लांबीचे फक्त मजबुतीकरण व डांबरीकरण करणे या कामाचा समावेश होता. यात या १३०० लांबीच्या रुंदीकरणाचा समावेश केलेला नव्हता.

(२) अंशत: खरे आहे.

तथापि सदर प्रश्नामधील रस्त्याची १३०० मी. लांबी ही नगरपालिका, चािखली यांच्या अधिपत्याखाली असून सद्य:स्थितीत या लांबीतील डांबरी पृष्ठभाग हा चौपदरी आहे. तसेच या रस्त्यावरील लांबीतील वाहतुक नियंत्रण पार्किग इ. बाबी चिखली नगरपालिकेशी संबंधित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे शहर आणि परिसरातील वाहनांची कोंडी व अपघाताचे प्रमाण टाळण्यासाठी ठाणे गायमुख, घोडबंदर रोड ते मिरारोड या दरम्यानच्या रस्त्यांचे सहा पदरीकरण करुन नवीन एलिव्हेटेड रस्ता/भुयारी रस्ता बांधण्याबाबत**

**(९) १०६९५ (१०-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहर आणि परिसरातील वाहनांची कोंडी व अपघाताचे प्रमाण टाळण्यासाठी ठाणे गायमुख, घोडबंदर रोड ते मिरारोड या दरम्यानच्या रस्त्यांचे सहा पदरीकरण करुन नवीन एलिव्हेटेड रस्ता किंवा भुयारी रस्त्यांची निर्मिती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी (ओवळा-माजिवडा) दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री व मा.सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे,

(३) या संदर्भात अद्याप निर्णय घेतला नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) विषयांकित कामाचा सुसाध्यता अहवाल तयार करणेसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला कार्यान्वीत यंत्रणा घोषित करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

**मलकापूर तालुक्यातील (जि.बुलढाणा) रणगांव-भालेगांव-निंबोळी रा.म.क्र. ६-तालसवाडा-म्हैसवाडी-नरवेल-हरसोडा-वडोदा-पान्हेरा-बहापुरा-बेलाड-घिर्णी-दाताळ या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत**

**(१०) १०७६७ (१०-०४-२०१५). श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर तालुक्यातील (जि.बुलढाणा) मौजे रणगांव - भालेगांव - निंबोळी रा.म.क्र. ६-तालसवाडा-म्हैसवाडी-नरवेल-हरसोडा-वडोदा-पान्हेरा-बहापुरा-बेलाड-घिर्णी-दाताळ हा रस्ता ३५.५० किमी यापैकी ६.२० किमी लांबीचा रस्ता अत्यंत नादुरुस्त असून या रस्त्यावरुन सर्व सामान्य नागरिक, दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना प्रवास करणे गैरसोईचे होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आली असून या खोलगट भागात लहान पुलाचे बांधकाम करण्यासाठी रु.१५० लक्ष निधीची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, बुलढाणा यांच्याकडे वांरवांर मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-१२-२०१५)** :(१) बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यामधील मौ. निंबोळी ते रा.म.मा.क्र.६ या इजिमा २४ दर्जाच्या रस्त्यावरील निंबोळी गावाजवळील सा.क्र. कि.मी. ४/६०० मध्ये व्याघ्रा नदीवर पूल बांधण्याकरिता रुपये १५० लक्ष इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे.
(२) रस्त्याच्या सुधारणेकरीता मा.लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगाव यांचेशी चर्चा केली आहे.
(३) व (४) प्रश्नाधीन रस्त्याची प्राथमिक पाहणी केली असून रसत्याचे दुरुस्तीचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

---

**जालना जिल्ह्यातून जाणाऱ्या जालना ते वडीगोद्री राज्यमार्गाचे चौपदरीकरणाबाबत**

**(११) ११५४४ (१०-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना-अंबड-वडीगोद्री (जि.जालना) रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाची निविदा प्रकिया पूर्ण झाली आहे काय,
(२) सदर रस्त्यासाठी एकूण किती खर्च येणार आहे,
(३) सदरील काम त्वरीत होण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर रस्त्याचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१२-२०१५)** :(१) हे खरे नाही. तथापि सदर रस्त्याचे काम खाजगीकरणातून कारण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त झाला होता. दरम्यान खाजगीकरणांतर्गत प्रकल्पाकरीता लहान वाहनाना, एस.टी.बसेस व स्कूलबस यांना पथकरातून वगळण्याचे निश्चित झाल्याने सदर प्रकल्प खाजगीकरणातून आर्थिकदृष्ट्या सुसाध्य झाला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) सदर प्रकल्पाचे काम अन्य योजनेतून हाती घेणे शक्य आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करुन प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना सुचित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आनगांव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील कवाळ नाका ते विश्वभारती दरम्यानच्या रस्त्यांची दुरावस्था झाल्याबाबत**

**(१२) १२३४१ (०९-०४-२०१५). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आनगांव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील कवाळ नाका ते विश्वभारती दरम्यानच्या रस्त्यांची दुरावस्था झाली असून यामुळे या रस्त्यावर वारंवार अपघात होतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा रस्ता दुरुस्तीबाबत संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करुनही कोणतीच कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधित रस्ता दुरुस्ती न करणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१५) :**(१) नाही.
(२) आनगांव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील कवाड नाका (कि.मी. ८३.०००) ते विश्वभारती (कि.मी. ८५.०००) या लांबीतील खड्डे डांबरमिश्रीत खडीने भरण्यात आलेले असून सध्या रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, गोरेगाव (पूर्व) येथील पश्चिम द्रुतगती मार्गावरील दिंडोशी पुलाचे दुरूस्तीचे काम**

**(१३) १२६१५ (०८-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, गोरेगाव (पूर्व) येथील ओबेरॉय मॉल शेजारी असणाऱ्या पश्चिम द्रुतगती मार्गावरील दिंडोशी पुलाचे दुरूस्तीचे काम वारंवार होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिंडोशीतील पूर्व व पश्चिम या दोन्ही बाजूच्या पुलाचे काम कोणत्या विकासकाकडून करण्यात आले आहे, सदर पूर्व बाजूच्या पुलांचे दुरूस्ती काम अद्यापपर्यंत किती वेळा केले व त्यासाठी किती खर्च करण्यात आला आहे,
(३) असल्यास, सदर पुलांचे दुरूस्ती काम वारंवार करण्याचे कारण काय आहे,
(४) असल्यास, सदर बांधकामाची चौकशी करून बांधकाम कंत्राटदारांवर व संबंधित अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०१५) :**(१) नाही.

(२) दिंडोशी येथील मुंबईकडे जाणाऱ्या उड्डाणपुलाचे बांधकाम मे.विलायती राम मित्तल यांनी वर्ष १९९९ मध्ये पूर्ण केले आहे. वाहतूक सुरक्षितता वाढविण्याच्या दृष्टीने स्ट्रक्टरल दुरुस्तीचे काम दोन वेळा हाती घेण्यात आले होते. माहे ऑक्टोबर, २०१३ मध्ये तातडीची दुरुस्ती व माहे मे, २०१४ मध्ये पुलावरील स्लॅबचे १२ पॅनल्सची स्ट्रक्चरल दुरुस्तीचे काम करण्यात आले. उड्डाणपुलाच्या स्ट्रक्चरल दुरुस्तीकरीता अंदाजे रु. १.३७ कोटी इतका खर्च झाला आहे. नियतकालीन दुरुस्ती आवश्यकतेनुसार वेळोवेळी पथकर कंत्राटात करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, अकोला यांनी केलेल्या अनियमिततेबाबत**

**(१४) १३९०२ (०९-०४-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अकोला यांनी केलेल्या अनियमिततेबाबत चौकशी करुन कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (मुर्तिजापूर) यांनी दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार सदरहू अधिका-यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१५) :**(१) होय.

(२) व (३) याप्रकरणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांचा चौकशी अहवाल प्राप्त झाला असून संबंधितांविरुध्द शासनस्तरावर शिस्तभंगविषयक कार्यावाही सुरु आहे.

---

**गोंदिया शहरात समाज भवनाच्या निर्मितीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१५) १५५८६ (१५-०५-२०१५). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया शहरात भव्य समाज भवनाच्या निर्मितीसाठी शासनाने मंजूरी दिली आहे व त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध झाली आहे काय, तसेच अद्याप जमीन उपलब्ध झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच उक्त समाज भवन किती कालावधीत पूर्ण करण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-१२-२०१५)** :(१) होय.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून रुपये ३०० लक्षसाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.
(२) या प्रकल्पासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास गोंदिया येथे प्रकल्पासाठी आवश्यक शासकीय जागा उपलब्ध नसल्याने मिळालेली नाही.
(३) व (४) बांधकाम हाती घेणेसंबंधी कार्यवाही प्रगतीत असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यात घाटी परिसरात बांधण्यात आलेल्या मेडिसिन इमारतीची झालेली दुरावस्था

**(१६) १५८०५ (१०-०४-२०१५). श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यात घाटी परिसरात २४ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेली मेडिसिन इमारत अवघ्या तीन वर्षापूर्वी बांधकाम विभागाकडून घाटीला सोपविण्यात आली असून सदर इमारतीची दुरावस्था झाल्याने तसेच तेथील तुटलेल्या फरशा तेथे येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांच्या तसेच डॉक्टर-कर्मचाऱ्यांच्या अंगावर पडत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शसनाने पाहणी/चौकशी केली आहे काय त्यात काय, आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१२-२०१५)** :(१) होय, अंशतः खरे आहे.

सदरील इमारत ही दि. ३०/०९/२०११ रोजी पूर्ण झाली असून दि. १४/०१/२०१३ रोजी घाटीला हस्तांतरीत करण्यात आली आहे. सदरील इमारत (तळ मजला+३) मजली असून, पाहणी केली असता सद्य:स्थितीत या इमारतीची दुरावस्था झालेली नाही. या कामाचा दोष दायित्व कालावधी दि. ३०/०९/२०१६ पर्यंत आहे. तिसऱ्या मजल्यावरील जिन्या जवळील दोन फरशा पडल्या होत्या. परंतू त्यामुळे कुणालाही इजा व दुखापत झाली नाही. सदर निखळलेल्या दोन फरशा बसवून दुरुस्ती करण्यात आली असून, सद्य:स्थितीत सदर इमारत सुस्थितीत आहे.

(२) काम दोष दायीत्व कालावधीत असल्यामुळे कंत्राटदाराच्या खर्चाने सदर काम वेळीच दुरुस्त करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह यातील सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे करुनही दोन वर्षापासून कंत्राटदाराची दिडशे कोटीची बिले प्रलंबित असल्याबाबत**

**(१७) १६००० (१०-०४-२०१५). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे करुनही दोन वर्षापासून कंत्राटदाराची दिडशे कोटीची बिले प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बिले मिळण्याबाबत शासनाकडे मागणी करुनही अदयापी कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बिले प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१२-२०१५) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पुरेशा निधीअभावी

(४) सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात तरतूद उपलब्ध करुन दिल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देऊळगांवराजा (ता.जि.बुलढाणा) नागपूर-पुणे राज्यमार्गाच्या चौपदरीकरण करण्यासाठी होत असलेली वृक्षतोडीबाबत**

**(१८) १७२८१ (०४-०९-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगांवराजा (ता.जि.बुलढाणा) नागपूर-पुणे राज्यमार्गाचे चौपदरीकरण करण्यासाठी शेकडो झाडे तोडावी लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ८० किलो मीटर अंतरावरील शेकडो झाडे तोडण्यात आल्याने तालुक्याचे पर्यावण बिघडले आहे. रोपे लागवडीनंतर त्या रोपांची निगा राखून ती जगविण्याची जबाबदारी संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीची होती मात्र बीओटी तत्वावरील काम अपूर्ण ठेऊन सदरहू कंपनीने पळ काढल्याने त्या रोपांकडेही दुर्लक्ष झाले आहेत हे पाहता शासनाने संबंधित दोषींवर कारवाई कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१२-२०१५) :**(१) या प्रकल्पापैकी प्रकल्प क्र.१ (जालना-देऊळगाव राजा बेराळा) व प्रकल्प क्र. २ (बेराळा फाटा ते चिखली खामगांव) अनुक्रमे दिनांक ३१/०३/२००९ व १९/०५/२०१० रोजी सुरु झाले. त्याकरिता रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे तोडण्यात आली.

तथापि माहे २०१५ मध्ये वा त्या सुमारास राज्य मार्गाचे चौपदरीकरणाकरिता झाडे तोडण्याचे निदर्शनास आले नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

प्रकल्पासाठी लावण्यात आलेली झाडे योग्य त्या देखभाली अभावी जगलेली नाहीत. उद्योजक काम योग्य रीत्या पुर्ण करु न शकल्याने उद्योजकाचे नाव काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही शासनाने केली आहे. आता संबंधीत उद्योजकासोबतचा करारनामा रद्द करुन या प्रकरणी सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या व्यवहारात पारदर्शकता येण्याबाबत

**(१९) १७४३० (०४-०८-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या बिघडलेल्या आर्थिक स्थितीला अपुरी टोलवसुली, टोलची नियमानुसार आकरणी न होणे यासारखी अनेक कारणे असल्याचे कॅगने आपल्या अहवालात नमूद केले असल्याचे माहे दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त महामंडळाच्या सर्व व्यवहारात पारदर्शकता व जबाबदारीची निश्चित करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०१५) :**(१) कॅगचा आढावा अहवाल शासनास सादर झाला आहे. त्यात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या आर्थिक स्थितीबाबत शासनास तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला काही सुचना केल्या आहेत.

(२) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे पथकर वसुली धोरणानुसार पथकर नाक्यांवर Electronic Display Board वर मंजूर पथकर दर्शविणारे दर व अन्य माहिती दर्शविण्यात आली असून त्याच्या अधीन राहून पथकर वसुली केली जाते. यात काही त्रुटी आढळल्यास ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात येते. महामंडळाच्या पथकर निविदेत पथकर कंत्राटदाराने आगाऊ रक्कम भरण्याबाबतच्या अटीचा समावेश करण्यात आला आहे. निविदेत नमूद केल्याप्रमाणे रक्कम कंत्राटदारामार्फत वेळीच भरण्यात आली नाही तर कंत्राटदाराची सर्व ठेव रक्कम जप्त करण्यात येते व गरज भासली तर कंत्राटदाराविरुध्द न्यायालयात याचिका दाखल करुन महामंडळाची उर्वरित रक्कम वसूल करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद-पैठण या रस्त्याच्या नुतनीकरणाबाबत**

**(२०) १८०७३ (१४-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-पैठण या अत्यंत वर्दळीच्या रस्त्याचे नुतनीकरण काम करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदन देऊन दिनांक ९ मार्च, २०१५ रोजी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) औरंगाबाद ते पैठण या रस्त्याचे /कि.मी. ३२६/७८० ते ३७२/६३५ (लांबी ४५.८५५ की.मी.) चौपदीकरण व वाळुंज ते वाल्मीकी रस्त्याचे (मजबुत बाजुपट्टयासह) कि.मी. ०/०० ते ५/२०० (लांबी ५.२०० कि.मी.) चा पीपीपी अंतर्गत प्रस्तावना मंत्रीमंडळ पायाभूत समितीने दि.०३/०९/२०१४ रोजी मंजूरी दिलेले दोन्ही प्रस्ताव मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांनी शासनाकडे अंतीम मंजूरीसाठी पाठविले आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद ते पैठण हा रस्ता संत एकनाथ महाराज यांची समाधी, जायकवाडी धरण, संत ज्ञानेश्वर उद्यान, औद्योगिक विकास परिसर तसेच दिल्ली, मुंबई, इंडस्ट्रियल, कॉरीडॉर, प्रकल्प इत्यादीमुळे अत्यंत महत्वाचा तसेच वाळूंज ते वाल्मीकी रस्ता (रा.मा. ३० व रा.मा. ६०) यांना जोडणारा महत्वाचा असल्याने दोन्ही प्रस्तावास शासनाने अंतीम मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

हे निवेदन दिनांक २४/०३/२०१५ रोजीचे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर प्रस्तावाच्या निविदा रद्द करण्यात आल्या असून सुधारीत प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करण्याच्या सूचना मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना दि. ३/१०/२०१५ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे चिखली (ता.नेवासे, जि.अहमदनगर) येथे राज्य व राष्ट्रीय महामार्गावरील झाडे जाळून कोळश्यासाठी केलेली वृक्षतोड**

**(२१) १८८६९ (१४-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिखली (ता.नेवासे, जि.अहमदनगर) येथे राज्य व राष्ट्रीय महामार्गावरील झाडे कोळशासाठी जाळ्यात येत असल्याचे माहे मे, २०१५ च्या तिस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार राज्य व राष्ट्रीय महामार्गावरील झाडे जाळून तोडणा-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१५) :**(१) नाही. हे खरे नाही.

नेवासा तालुक्यात प्रश्नांकीत मौजे चिखली नावाचे गाव नाही. तथापि, अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुका व संगमनेर तालुका अशा दोन ठिकाणी मौजे चिखली या नावाची गांवे असून या दोन्हीही ठिकाणी सा.बां. मंडळ अहमदनगरच्या कार्यक्षेत्रातील राज्यमार्गावर सदरची बाबत घडलेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय वस्त्रोद्‌योग महामंडळाने जॉईंट योजने अंतर्गत कापड उद्‌योगाशी शिलाई मशीन व गोदामासाठी करण्यात येत असल्याने योजनेच्या मुळ उद्देशाला बगल देवून शासनाची फसवणूक करुन जमीन बळकावण्याचे कारस्थानाबाबत**

**(२२) १९२२७ (०५-०९-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **वस्त्रोद्‌योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय वस्त्रोद्‌योग महामंडळाने जॉईंट व्हेंचर योजने अंतर्गत कापड उद्‌योगाशी संबंधीत व्यवसाय करण्यासाठी खाजगी कंपन्यांना देण्यात आलेल्या गिरण्यांच्या जमीनींचा वापर, शिलाई मशीन व गोदामासाठी करण्यात येत असल्याने योजनेच्यामुळ उद्देशाला बगल देवून शासनाची फसवणूक करुन जमीन बळकावण्याचे कारस्थान सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास , उक्त प्रकरणी त्यानुसार संबंधींतांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-११-२०१५)** :(१) नाही.

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ हे केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली असून केंद्र शासनाच्या मान्यतेने व बी.आय.एफ.आर. च्या निर्देशानुसार पहिल्या टप्प्यात एन.टी.सी. च्या इंडिया युनायटेड मिल नं. १, अपोलो मिल, न्यु सिटी मिल, गोल्ड मोहर मिल, औरंगाबाद टेक्सटाईल मिल या ५ गिरण्या संयुक्त भागीदारी तत्वावर चालविण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एन.टी.सी. व भागीदार कंपनीचे अधिकारी मिळून स्वतंत्र संचालक मंडळ कार्यरत आहे. या मिलच्या आवारात भागीदारी कंपनीमार्फत गारमेंटींगचा व्यवसाय केला जातो. एम.ओ.यु.नुसार एन.टी.सी. चा भाग ५१% व खाजगी कंपनीचा भाग ४९% असल्याने खाजगी कंपनीने जमिन बळकावण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे-मुंबई या द्रुतगती मार्गावर संरक्षक वायर बसविण्याबाबत

**(२३) १९२७६ (३१-०७-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-मुंबई या द्रुतगती मार्गावर अपघात होऊन वर्षाला सरासरी ८५ जनांचा मृत्यु होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-२०१५ मध्ये द्रुतगती मार्गावर रस्ता दुभाजकता संरक्षक वायर बसविल्याने गंभीर अपघातात ५०% नी घट झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे-मुंबई या द्रुतगती मार्गावर अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी संपूर्ण ९४ कि.मी. अंतरात संरक्षक वायर बसविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-१२-२०१५)** :(१) पोलीस विभागाच्या आकडेवारीनुसार वर्ष २००९ ते मे २०१५ पर्यंत मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर झालेल्या २६०६ अपघातांमध्ये ८०५ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

पोलीस विभागाच्या आकडेवारीनुसार वर्ष २००९ ते मे २०१५ पर्यंत मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर झालेल्या अपघातांची व त्यात मृत व्यक्तींची आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | एकूण अपघात | एकूण मृत व्यक्ती |
|---|---|---|
| २००९ | ५४१ | १३१ |
| २०१० | ४५८ | १०४ |

| | | |
|---|---|---|
| २०११ | ४१२ | ११८ |
| २०१२ | ३६४ | १४६ |
| २०१३ | ३३९ | १२९ |
| २०१४ | ३५३ | १३३ |
| २०१५ | १३९ | ४७ |

(२) होय, अपघांताच्या वरील आकडेवारी नुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर रसता दुभाजकता सरंक्षक वायर बसविण्यासह केलेल्या विविध उपाययोजनांमुळे एकूण संख्येत सातत्याने घट झाली आहे.

(३) सुरुवातीला प्रायोगिक स्तरावर कामशेत बोगदा ते ओझर्डे या ५ कि.मी. लांबीमध्ये सदर प्रकारची रस्ता दुभाजकता संरक्षक वायर लावण्यात आली आहे. सदरचे रस्ता दुभाजकता संरक्षक वायर अत्यंत परिणामकारक असल्याने १२ कि.मी. लांबीसाठी सदर प्रकाराचे रस्ता दुभाजकता संरक्षक वायर लावण्याचे काम नुकतेच पूर्ण करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त उर्वरित लांबीमध्ये सुध्दा अशा प्रकारचे रस्ता दुभाजकता संरक्षक वायर बसविण्याचा निर्णय संचालक मंडळाने नुकसाच घेतला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील टोल नाके बंद करण्याबाबत

**(२४) १९८४९ (०२-०७-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील टोल नाके बंद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही शहरातील टोलच्या संदर्भात आढावा घेण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव (बांधकाम) श्री.आनंद कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, सदरहू अहवालात कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत, व त्यानुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) अद्यापही या समितीचा अहवाल प्राप्त झाला नसल्यास, किती कालावधीत अहवाल येण्याचे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०१५) :**(१) नाही.

(२) मुंबई प्रवेशद्वार येथील व मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील पथकर नाक्यांवर हलक्या वाहनांना पथकरातून सूट देण्याबाबत वित्तीय व कायदेशीर बाबी तसेच सुसाध्यता तपासून अहवाल सादर करण्यासाठी अपर मुख्य सचिव (सा.बां.) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे.

(३) नाही.
(४) अहवाल सादर करण्यासाठी सदर समितीला दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

---

**पाटण जि.सातारा तालुक्यात तालुक्याच्या ठिकाणी प्रशासकीय कार्यालय उभारण्यास राज्य शासनाकडून निधी उपलब्ध होणेबाबत**

**(२५) २१८९५ (१०-०८-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटण जि.सातारा तालुक्यात तालुक्याच्या ठिकाणी राज्य शासनाची विविध खात्याची शासकीय कार्यालये ही विविध ठिकाणी वसली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची सर्व शासकीय कार्यालये विविध ठिकाणी वसली असल्याने तालुक्यातील ग्रामस्थांना तालुक्याच्या ठिकाणी विविध कार्यालयांमध्ये आपल्या कामांकरीता जाण्याचा नाहक त्रास सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाटण या तालुक्याच्या ठिकाणी असणारी सर्व शासकीय कार्यालये ही एकाच प्रशासकीय इमारतीत एकत्रित आणण्याकरीता तालुक्याच्या ठिकाणी प्रशासकीय कार्यालयाची एक इमारत बांधणेकरीता राज्य शासनाने निधी उपलब्ध करुन देणेबाबत राज्याचे मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी तालुक्याचा लोकप्रतिनिधी यानी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने पाटण जि.सातारा तालुक्यात प्रशासकीय इमारत बांधणेसंदर्भात निधी उपलब्ध करुन देणेकरीता कोणता निर्णय घेतला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) प्रश्नाधीन शासकीय कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने नागरिकांची काही प्रमाणात गैरसोय होते, हे खरे आहे.
(३) होय.
(४) व (५) राज्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधण्याचे शासनाचे धोरण आहे. प्रश्नाधीन तालुक्यात मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही.जागा उपलब्ध होताच प्रश्नाधीन ठिकाणी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधण्याचे काम निधी निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**तारळे (ता.पाटण) या गावातील तारळे ते घोट या प्रमुख मार्गावरील अतिक्रमणे काढण्याबाबत**

**(२६) २१९१३ (१३-०८-२०१५). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारळे (ता.पाटण) या गावामधून तारळे ते घोट हा प्रमुख रस्ता जात असून या गांवामधील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात स्थानिकांनी अतिक्रमण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अतिक्रमणामुळे रस्त्यांची रुंदी मोठ्या प्रमाणात कमी झाली असून या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक खोळबंली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची अतिक्रमणे तातडीने काढणेबाबत या गावांतील ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे सातत्याने मागणी करुनही सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१५) :**(१) सदर रस्ता हा प्रजिमा-५७ दर्जाचा असून सदर रस्त्याच्या जागेच्या रेकॉड नुसार हद्दीच्या खुणा निश्चित न झाल्याने अद्याप अतिक्रमण आहे हे ठरविता आले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळगडावरील शासकीय कार्यालयाचे बांधकाम प्रलंबित असल्याबाबत**

**(२७) २२०२९ (३१-०७-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील पन्हाळगडावरील शासकीय कार्यालयाना स्वमालकीची जागा नसल्यामुळे गेली पाच वर्षे प्रशासकिय मंजूरी मिळूनही तांत्रिक बाबी पूर्ण न झाल्याने एकाच छताखाली सर्व शासकीय कार्यालये असणा-या मध्यवर्ती प्रशासकिय इमारतीचे बांधकाम पाच वर्षांपासून प्रलंबित असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) उक्त प्रश्नाबाबत शासकिय कार्यालयांना स्वतःची हक्काची इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१२-२०१५) :**(१) सदर कामास शासन निर्णय दि. १६/०३/२०११ अन्वये रु. ६६४.०५ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता मिळाली असून, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे यांनी दि. ०२/०४/२०१२ अन्वये रु. ६१३.५६ लक्ष इतक्या किंमतीचे अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार निविदा निश्चिती करणेत येवून दि. ०७/११/२०११ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तथापि सदर कामासाठी अद्याप जागा ताब्यात मिळालेली नसल्याने व बांधकाम करण्यासाठी परवानगी प्राप्त नसल्याने, प्रस्तावित काम सुरु करता आलेले नाही. या अनुषंगाने काम बंद असलेबाबतचे कोणतेही निवेदन/तक्रार अद्याप प्राप्त नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) शासनामार्फत जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार सदरची जागा ताब्यात मिळणेबाबत व बांधकाम करणेस परवानगी मिळणेबाबत पाठपुरवा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेवराल-धर्मापूरी, खरडा-रेवराल, नवरगाव-खंडाळा, ढोलमारा-नवरगाव (ता.मौदा, जि.नागपूर) येथील जोडणारे रस्ते असून या मार्गाची झालेली दुरवस्था**

**(२८) २२१२२ (३१-०७-२०१५). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेवराल-धर्मापूरी, खरडा-रेवराल, नवरगाव-खंडाळा, ढोलमारा-नवरगाव (ता.मौदा, जि.नागपूर) येथील जोडणारे रस्ते असून त्या मार्गाची दुरावस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दुस-या आठवड्यात शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मार्गांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळाला असतानाही दुरुस्ती व बांधकामाचे काम अद्यापपर्यंत सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर खडड्यामुळे मोठ्या प्रमाणावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रस्त्यांच्या रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम तातडीने सुरु करण्याची मागणी तेथील नागरिकांनी संबंधित विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-१२-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.
काम सुरु करण्यात आले आहे.
(३) नाही.

(४) होय, हे खरे आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ताडाळी-साखरवाही-घुग्घुस या मार्गाची रुंदी वाढविण्यासंदर्भात

**(२९) २२१५२ (३१-०७-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर मतदार संघातील ताडाळी-साखरवाही-घुग्घुस या रस्त्यावरील दैनंदिन वाहतुक वर्दळ २१६६०.२० मेट्रीक टन असून प्रमुख जिल्हा मार्गावरील प्रमाणांच्या जास्त असल्यामुळे सदर रस्ता क्षतीग्रस्त होण्याचे प्रमाण जास्त असल्याचे उत्तर दिनांक १८ मे, २०१५ च्या कपासू-२०१५/९६/प्र.क्र.८९/रस्ते ४-अ अन्वये मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी लेखी उत्तर स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ताडाळी-साखरवाही-घुग्घुस हा मार्ग अरुंद असून या मार्गावर मोठे मोठे खड्डे पडले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मार्गावरुन होणारी दैनंदिन वाहतुक वर्दळ लक्षात घेता या मार्गाची रुंदी वाढविण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ताडाळी-साखरवाही-घुग्घुस हा मार्गाची रुंदी वाढविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-१२-२०१५)** :(१) होय.
(२) प्रश्नांकित रस्त्याची रुंदी ५.५० मीटर असून या रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत हे अंशत: खरे आहे.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेतीमालाच्या खरेदी - विक्रीच्या व्यवहारात आकारल्या जाणा-या अडतीबाबत

**(३०) २२३२० (१८-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतीमालाच्या खरेदी - विक्रीच्या व्यवहारात आकारली जाणारी अडत पुणे व मुंबई प्रमाणेच बाजारात शेतीमाल आणणा-यांकडून ते राज्याच्या अन्य भागांत ती खरेदीदारांकडून घेण्याच्या

प्रस्तावावर तसेच तोलाई, इमारती यांच्या दरासंदर्भात राज्य सरकारने या संदर्भात अभ्यास गट नेमला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देशात महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश ही दोन राज्य वगळता देशात अन्यत्र कोणत्याही शेतक-यांकडून अडत घेतली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अभ्यासगटाकडून कोणती शिफारस शासनास करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :**(१) होय.
(२) होय.
(३) सदर समितीकडून अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(४) समितीची कार्यकक्षा व्यापक केल्यामुळे तसेच समितीमध्ये विधानसभा सदस्यांचा समावेश असल्यामुळे अधिवेशन काळात समितीच्या सभा होऊ शकल्या नाही. त्यामुळे अहवाल तयार होऊ शकला नाही. समितीच्या अध्यक्षांनी मागणी केल्यानुसार मुदतवाढीचा प्रस्ताव शासन विचाराधीन आहे.

---

**तांदळाच्या निर्यातीत ६० टक्के घट झाल्याबाबत**

**(३१) २२६०६ (०९-०८-२०१५). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गतवर्षीच्या तुलनेत यंदा तांदळाच्या निर्यातीत ६० टक्के घट झाल्याची शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निर्यातीमधील घटामुळे शेतकरी व व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निर्यात घटीबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-११-२०१५) :**(१) देशातून निर्यात होणाऱ्या तांदळाची (बासमती व इतर) एकत्रित माहिती केंद्र शासनाच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या अधिपत्याखालील कृषी व अन्न प्रक्रिया निर्मिती निर्यात विकास प्राधिकरण (APEDA) मार्फत ठेवली जाते त्यामध्ये राज्याची स्वतंत्र माहिती नसून देशाची एकत्रित माहिती आहे. सन २०१३-१४ मध्ये बासमती तांदळाची निर्यात ३.७५ कोटी मे.टन होती. तर इतर तांदळाची ७.७५ कोटी मे.टन होती. सन २०१४-१५ मध्ये बासमती तांदळाची निर्यात ३.७० कोटी मे.टन तर इतर तांदळाची८.२७ मे.टन अशी निर्यात होती.

सन २०१३-१४ च्या तुलनेत सन २०१४-१५ मध्ये दोन्ही प्रकारच्या तांदळाच्या निर्यातीमध्ये अल्पशी घट दिसून येते.
(२) अशी वस्तूस्थिती दिसून आली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ऊसापासून इथेनॉल निर्मिती धोरण स्वीकारण्याबाबत**

**(३२) २३२५१ (१९-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्यांच्या माध्यमातून इथेनॉल निर्मिती सुरु केल्यास ऊसाला प्रती टन ३५०० रुपये दर मिळणार असल्याने शासनाने ऊसापासून इथेनॉल निर्मिती धोरण त्वरीत स्वीकारावे अशी मागणी जैव इंधन शेतकरी संघटना यांनी मा.मुख्यमंत्र्यांकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :** (१) ऊसापासून थेट इथेनॉल निर्मिती धोरण स्वीकारणेबाबत जैव इंधन शेतकरी संघटना, कोल्हापूर यांनी दि. ३/०१/२०१५ चे पत्रान्वये मा.पंतप्रधान (भारत सरकार) यांना उद्देशून पत्र लिहिलेले असून त्याची प्रत मा.मुख्यमंत्री महोदयांना पृष्ठांकित केलेली आहे.
(२) सध्या मळीपासून इथेनॉल निर्माण केले जात आहे. ऊसाच्या रसापासून थेट इथेनॉल निर्मिती केल्यास सदर प्रकल्पांना परवानगी देण्याचे अधिकार हे केंद्र शासनाच्या अधिकारी कक्षेतील विषय आहेत. तसेच जे अस्तित्वातील इथेनॉल प्रकल्प आहेत त्या प्रकल्पांचे आधुनिकरीकरण करावे लागले. त्यासाठी कारखान्यांना मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागेल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंत्रालयाच्या इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत**

**(३३) २३३४४ (१३-०८-२०१५). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभागाने मंत्रालयाच्या इमारतीचे बांधकाम अद्यापपर्यंत पुर्ण न केल्याने अनेक विभागांची कार्यालये मंत्रालयाबाहेरील इमारतीमधून सुरू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणामुळे जनसामान्यांची मोठी अडचण होत असल्याने जनतेची कामे लवकर व्हावीत यासाठी मंत्रालयाच्या इमारतीमध्ये सर्व कार्यालये तातडीने सुरु करण्याबाबत तसेच मंत्रालयाच्या नविन इमारतीमध्ये आग, भुकंप, पाऊस इ.पासून संरक्षणाची योग्य उपाययोजना करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१२-२०१५) :**(१) मंत्रालय इमारतीचे दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम पूर्ण झाले असून बहुतांश कार्यालये मंत्रालय इमारतीमधून कार्यरत आहेत. सद्य:स्थितीत मंत्रालय इमारतीतील जागेअभावी सार्वजनिक आारोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग व ग्रामविकास विभाग हे तीन विभाग बाहेरील इमारतीत कार्यरत आहेत.
(२) मंत्रालय मुख्य इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम पूर्ण झाले असून, इमारतीमध्ये सळई-तुळ्यांचे सांधे FRP wraps चे polymer repairs, microconcrete ही कामे करुन सदर सांध्याची भूकंपरोधक क्षमता वाढविण्यात आली आहे. त्याप्रमाणे संकल्पन सल्लागार यांनी प्रमाणीत केले आहे. मंत्रालय मुख्य इमारतीच्या नुतनीकरणाच्या कामात आग प्रतिबंधक उदा. कोर्टयार्डमध्ये फायर, हाईड्रंट ड्रेंचर सिस्टिम, वेट रायझर सिस्टिम, स्प्रिंकलर्स सिस्टिम ओपन ड्रेंचर सिस्टिम, फायर रेझिस्टंट, स्प्रिंकलर्स डोअर्स, प्रेशरायझेशन, स्मोक डिटेक्टर्स (National building code २००५ नुसार) इत्यादी कामे करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घोन्सा (ता.वणी) येथील विदर्भा नदीवरील पुलाच्या दुरुस्तीबाबत**

**(३४) २३४४४ (३१-०७-२०१५). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), प्रा.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घोन्सा (ता.वणी) येथील विदर्भ नदीवरील पुलाची मागील दोन वर्षापासून एक बजू पुर्णतः खचली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाला वारंवार निवेदने देऊनही या पुलाची अजुनही दुरुस्ती झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलाची दुरुस्ती करण्याबाबत व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.
जुलै २०१४ मध्ये अतिवृष्टीने सदर पुलाच्या एका बाजूच्या पोचमार्गाची मातीभराव वाहून गेल्याने पोचमार्ग क्षतीग्रस्त झाला होता. मात्र पुल सुस्थितीत आहे.
(२) हे खरे नाही.

वाहतूक सुरळीत करण्याच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात पोचमार्ग दगड व मुरमाने पूर्ववत करण्यात आला असून, वाहतूक सुरळीत चालू आहे.

(३) पोचमार्गाचे कायमस्वरुपी दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील राळेगांव, कळंब, बाभुळगाव, केळापूर तालुक्यातील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(३५) २३४६२ (१९-०८-२०१५). प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील राळेगांव, कळंब, बाभुळगाव, केळापूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे गेल्या तीन वर्षात पूर्ण झालेली रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचे दिनांक २१ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार दोष दायित्व कालावधीत कंत्राटदाराच्या खर्चातून रस्ते का दुरुस्त करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच रस्ते पूर्ण बांधकाम झाल्यानंतर किती कालावधीत खराब होणार नाही याची हमी कंत्राटदाराकडून घेण्यात येते काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

दोष दायित्व कालावधीत रस्ते खराब झाल्यास कंत्राटदाराकडून त्यांच्या खर्चाने दुरुस्त करण्यात येतात.

(३) होय.

निविदा शर्तीनुसार २४ महिने दोष दायित्व कालावधी असतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कनिष्ठ अभियंत्यांची सेवा ज्येष्ठता यादी अद्ययावत नसल्याबाबत**

**(३६) २३७५४ (३०-०७-२०१५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत एकूण किती कनिष्ठ अभियंता कार्यरत असून सदरील कनिष्ठ अभियंत्यांची सेवा ज्येष्ठता यादी सन २०१५ अखेर अद्ययावत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील यादी अद्ययावत न करण्याची कारणे काय आहेत व सदरील यादी अद्ययावत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१५)** :(१) हे खरे नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सद्य:स्थितीत अपदवीधर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) संवर्गात एकूण २२७५ अभियंता कार्यरत आहेत.

अपदवीधर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गाची दि. १.४.२००७ ते दि. ३१.१२.२०१४ या कालावधीची दि.१.१.२०१५ रोजीची तात्पुरती ज्येष्ठता यादी दि. २८.७.२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ता.शहापूर (जि.ठाणे) प्रकल्पांतर्गत आदिवासी मुलांचे-मुलीचे**
**वसतिगृह व शिक्षक निवासस्थान बांधण्याबाबत**

**(३७) २४३७३ (३०-०७-२०१५). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ता.शहापूर (जि.ठाणे) प्रकल्पांतर्गत आदिवासी मुलांचे-मुलीचे वसतिगृह शिक्षक निवासस्थान बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांना ३ कोटी ३१ लाखांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे काम आर.के.सावंत या नाशिक येथील ठेकेदार कंपनीस देण्यात आले असून या कंपनीने बांधकामासाठी माती मिश्रित रेती अनेक वर्षापासून धुळ खात पडलेले असलेली खडी स्लॅब साठी तसेच गंजलेले लोखंड वापरले असल्याचे माहे मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या बांधकाम विभाग व प्रकल्प विभागावर देखरेख ठेवून काम करुन घेण्याची जबाबदारी आहे त्याच्यांकडून दुर्लक्ष झाले आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीत काय आढळून आले,
(५) तसेच संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-१२-२०१५)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदर कामे बांधकामामध्ये आवश्यक असलेल्या साहित्यांची गुणवत्ता/दर्जा तपासूनच करण्यात येत आहे.
(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वरोरा (जि.चंद्रपूर) येथील कृषि बाजार समितीमधील कर्मचारी भरतीवर स्थगिती मिळण्याबाबत**

**(३८) २४७२६ (१३-०८-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा, जि.चंद्रपूर येथील कृषि बाजार समितीमधील कर्मचारी भरतीवर स्थगिती मिळण्याबाबतचे दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी मा.सहकार राज्यमंत्री, यांनी मा.पणन राज्यमंत्री यांना विनंती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या विनंतीनुसार या प्रकरणी कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,
(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२०-११-२०१५) :**(१) होय.
(२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांचेकडे या प्रकरणाची चौकशी चालू असून दि. २१.९.२०१५ रोजी सुनावणी झाली असून पुढील सुनावणी दि. २१.१०.२०१५ रोजी आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूरातील रस्ते विकास प्रकल्पातंर्गत करण्यात आलेल्या कामांपैकी अपूर्ण कामे व न झालेल्या कामांच्या स्वतंत्र अहवालबाबत**

**(३९) २५०२० (३१-०७-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूरातील रस्ते विकास प्रकल्पातंर्गत करण्यात आलेल्या कामांपैकी अपूर्ण कामे, न झालेल्या कामांचा स्वतंत्र अहवाल तयार करा अशा सूचना रस्ते विकास महामंडळाचे सहाय्यक व्यवस्थापकीय, संचालक यांनी नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवाल रस्ते विकास महामंडळास प्राप्त झाला आहे तसेच चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) तदनुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०१५)** :(१) होय.

(२) सदर अहवाल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास प्राप्त झाला असून त्याबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर खाजगी जागेवर जाहिरात फलक उभारण्यासाठी वृक्षतोड मोठया प्रमाणात होत असल्याबाबत

**(४०) २५१९८ (१४-०८-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर खाजगी जागेवर जाहिरात फलक उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जात असल्याचे माहे मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबा, साग, सुबाभूळ, जांभूळ, खैर, उंबर, पिंपळ आदी दुर्मिळ वृक्षांची बेसुमार वृक्षतोड केल्याप्रकरणी पर्यावरणप्रेमींनी शासनाकडे तक्रार करुन कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार खाजगी जागेवर वृक्षांची तोड करुन जाहिरात फलक उभारणा-या किती कंपन्यांवर आतापर्यंत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-११-२०१५)** :(१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) या संदर्भात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून वेळोवेळी पाहणी करण्यात येत असते. या पाहणीमध्ये प्रस्तुत मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या हद्दीबाहेर दोन्ही बाजूस मोठमोठे जाहिरात फलक बसविण्यात आल्याचे आढळून आले आहे. याबाबत महामंडळाकडून अशा स्वरुपाच्या खाजगी जमिनीवर जाहिरात फलकांबाबत कारवाई करण्यासाठी संबंधित यंत्रणास विनंती करण्यात आली आहे. तसेच अनधिकृतरित्या वृक्षतोड झाल्यास तक्रार दाखल करण्याची कार्यवाही करणेबाबत महामंडळास सुचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा आणि चंदगड तालुक्याच्या ठिकाणांना जोडणा-या आजरा-चंदगड मार्गावर असलेली झाडेझुडपे हटविण्याबाबत**

**(४१) २५५३१ (३०-०७-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा आणि चंदगड तालुक्याच्या ठिकाणांना जोडणा-या आजरा-चंदगड मार्गावर मोठ्या प्रमाणात झाडेझुडपे वाढल्याने रस्ता वाहतुकीस अडचणी निर्माण झाल्यामुळे सदर रस्ताच्या कडेला असलेली झाडेझुडपे हटविण्याची मागणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी, चंदगड यांनी दिनांक १५ जून, २०१५ रोजी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१५) :**(१) होय.

(२) झाडेझुडपे हटविण्याची कार्यवाही झालेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कृषी, फलोत्पादन आणि पणन विभागामार्फत सबसिडी अंतर्गत फळभाजी विक्रीसाठी विशेष शासकीय स्टॉल मंजूर करण्याबाबत**

**(४२) २५७५६ (१९-०८-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी, फलोत्पादन आणि पणन विभागामार्फत सबसिडी अंतर्गत फळभाजी विक्रीसाठी विशेष शासकीय स्टॉल मंजूर करण्याचे धोरण शासनामार्फत सन २००० ते २०१५ दरम्यान राबविण्यात येवून त्या अंतर्गत राज्यातील विविध महिला विकास मंडळ, अशासकीय संघटनांना सबसिडी अंतर्गत फळबाजी विक्रीसाठी मुंबई शहर तसेच ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, मिरा-भाईंदर, भिवंडी, नाशिक, पुणे इत्यादी शहरात उपलब्ध जागेनुसार स्टॉल वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरस्वती बहुउद्देशीय महिला विकास मंडळ चेंबूर (मुंबई) या संस्थेत माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान कृषी, फलोत्पादन आणि पणन विभागाकडे सदरील योजने अंतर्गत उपरोक्त शहरामध्ये फळभाजी विक्रीसाठी विशेश शासकीय स्टॉलची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-११-२०१५) :**(१) महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या माध्यमातून शहरी भागांसाठी भाजीपाला पुरवठा योजना कार्यान्वित झालेली आहे. तथापि, सदर योजनेंतर्गत स्टॉल वाटप करण्यात आलेले नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विविध रस्त्यांची अवस्था दयनीय असल्याबाबत**

**(४३) २५८८७ (३१-०७-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध रस्त्यांची कामे बीओटी तत्वावर केली जाऊन त्या बदल्यात टोलवसूली करण्यात येते मात्र टोल रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून ठिकठिकाणी रस्त्यांवर खड्ड्याचे साम्राज्य असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावर केलेला खर्च कमी आणि टोल मात्र अतिरिक्त वसूल केला जातो हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणात पारदर्शकता आणण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-१२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

निविदा अटी व शर्ती प्रमाणे रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करण्याबद्दल त्या त्या विभागाच्या अभियंत्यामार्फत दक्षता घेण्यात येत असते.

(२) हे खरे नाही.

मंजूर निविदा शर्तीप्रमाणे पथकर आकारणी करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीत पावसाळ्यापूर्वी इमारतीची दुरुस्ती देखभाल व साफसफाईची कामे त्वरीत करण्याबाबत**

**(४४) २६११३ (१४-०८-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहत इमारत क्र.१ ते १० च्या पावसाळ्यापूर्वी इमारतीची देखभाल व साफसफाईची कामे करणाऱ्या सर्व ठेकेदारांच्या देयकांना तात्काळ

स्थगिती देऊन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतनिधींनी मा.उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दिनांक ९ फेब्रुवारी,२०१५ व दिनांक ३ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विनंतीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१२-२०१५)** :(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम विभाग, आकोला-पातूर रा.मा.कि.मी. ४०/४०० ते ४६/००**
**ची सुधारणेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(४५) २६४२० (०५-०९-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, आकोला-पातूर रा.मा.कि.मी. ४०/४०० ते ४६/०० ची सुधारणा सन २०११-१२ ते २०१३-१४ या तीन वर्षाच्या कालावधीत दोन वेळा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू काम दोन वेळा कोण-कोणत्या योजनेतून करण्यात आली, त्यावर एकूण किती खर्च करण्यात आला, तसेच काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे पुन्हा काम करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच संबंधित दोषी व्यक्तींना शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१५)** :(१) हे खरे नाही.

अकोला-पातुर रस्त्यावर सन २०११-१२ ते २०१३-१४ या तीन वर्षाच्या कालावधीत कि.मी. ४०/०० ते ४६/०० ह्या भागामध्ये दोन वेगळ्या भागावर कामे मंजूर होती व त्यानुसार ही कामे केलेली आहेत.

(२) हे खरे नाही.

सन २०११-१२ मध्ये १२ व्या वित्त आयोगांतर्गत कि.मी. ४२/६०० ते ४४/६०० असे रु. ५६ लक्ष काम मंजूर होते. सन २०१३-१४ मध्ये कि.मी. ४०/०० ते ४१/०० मध्ये रस्ता देखभाल व दुरुस्तीचे रु. १०.०० लक्ष चे काम मंजूर होते.

त्यानुसार अनुक्रमे रु. ५२.८५ लक्ष व रु ९.०९ लक्ष कामावर खर्च झालेला आहे.

वरील दोन्ही कामाव्यतिरिक्त सदर रस्त्याच्या भागामध्ये कोणतेही काम मंजूर नसून वरील दोन्ही कामामुळे रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित झाला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला बार्शिटाकळी रा.मा.१९७ कि.मी. ४९/५०० ते ६६/६०० रस्त्याची सुधारणा करणेबाबत**

**(४६) २६४२१ (०४-०८-२०१५). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला बार्शिटाकळी रा.मा.१९७ कि.मी. ४९/५०० ते ६६/६०० रस्त्याची सुधारणा करण्यासाठी एमजी६/एमएच २००६ दिनांक २७ फेब्रुवारी, २००७ नुसार कैंद्रीय मार्ग निधी अंतर्गत ५ कोटी रुपये मंजुरात करण्यत येऊन सदर काम संजय कन्स्ट्रक्शन, अचलपूर यांना कारारनामा क्र.ब.१/१३८/२००७-२००८ कार्यारंभ आदेश क्र.१२३९/दिनांक २९ ऑक्टोबर, २००७ कालावधी २४ महिने या प्रमाणे देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू देयक १ ते ७ श्री.ए.यु.देशमुख, उप अभियंता यांचे कार्यकाळात त्याच्या संमतीने देण्यात अाले तसेच मे, २०१० ला त्यांची बदली झाल्यानंतर ८ वे देयक सहाय्यक अभियंता एस.पी.अंभोरे व श्री.राजुरक, शाखा अभियंता यांनी दिले व त्यानंतर देयक क्र.९ (रु.२२ लाख) हे मार्च, २०१४ ला कोणतेही काम न करता तसेच सहाय्यक अभियंता, एस.पी.अंभोरे, उपविभागीय कार्यालय क्र.१ येथे कार्यरत असताना देयकावर त्यांची स्वाक्षरी न घेता देण्यात आले व मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार यामध्ये झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे का तसेच सदर प्रकरणी दक्षता पथक, मुंबई यांचे मार्फत चौकशी करुन दोषींवर निलंबनाची कार्यवाही करण्यात येईल का,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-११-२०१५)** :(१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अलिबाग (जि.रायगड) जिल्हा रुग्णालयातील अनुदानाबाबत**

**(४७) २६४९९ (१७-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४-१५ अंतर्गत जिल्हा रुग्णालय अलिबाग (जि.रायगड) यांचे आवारामध्ये सामान्य नागरिकांसाठी सार्वजनिक शौचालये व स्नानगृहांचे बांधकाम न करता सदर काम पूर्ण झाल्याचे पत्र जिल्हा शल्य चिकित्सक यांना देऊन अनुदान लाटण्याचा प्रकार नुकताच माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) तदनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-१२-२०१५)** :(१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाशिम जिल्ह्यातील राज्य महामार्गावर होत असलेले अतिक्रमणाबाबत

**(४८) २७२२६ (०७-०८-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशीम जिल्ह्यातील सर्व राज्य महामार्गावर अतिक्रमण झाल्यामुळे वाहतुकीला अडचणी होत आहे व अपघाताचे प्रमाण सुध्दा वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रहदारीसाठी जिल्ह्यातील सर्व राज्य महामार्ग केव्हापर्यंत मोकळा होणार आहे,
(३) उक्त प्रकरणी अतिक्रमण होण्यास व ते हटविण्यास दिरंगाई करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१५)** :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) या विभागामार्फत नगर परिषद महसुल विभाग, पोलीस खाते यांचे सहकार्याने संयुक्तरित्या दि. ०३.०२.२०१५ व दि. ०४०२.२०१५ रोजी अतिक्रमण काढण्याची मोहिम राबविण्यात येऊन अतिक्रमण हटविण्यात आले असून रस्ते वाहतुकीस मोकळे करण्यात आले आहेत.
(३) वरील प्रमाणे अतिक्रमण वेळोवेळी काढण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### काळम्मावाडी पाईपालाईन योजनेचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंजूरी अभावी योजनेचे काम प्रलंबित राहिल्याबाबत

**(४९) २७७४७ (१४-०८-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काळम्मावाडी थेट पाईपालाईन योजनेला शासनाने निधी दिला मात्र पाईप टाकण्याच्या पहिल्या टप्प्यात महापालिकेने २१ कि.मी. साठी वनविभाग, जिल्हापरिषद, पाटबंधारे विभाग व

सर्वजनिक बांधकाम विभागाकडे जागा ताब्यात देण्यासाठी पाठविलेला प्रस्ताव गेल्या दीड वर्षापासून धुळखात पडून असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंजूरी अभावी योजनेचे काम प्रलंबित राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र आर.बी.डी. २०१५/प्रक्र..७९/रस्ते-७ दि. २६/०६/२०१५ नुसार सदर कामास परवानगी मिळालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### उस्मानाबाद जिल्ह्यात साधारण ४०५ एकरवर तुतीची लागवड केल्याबाबत

**(५०) २८१८६ (३१-१०-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यात सन २०१५ मध्ये साधारण ४०५ एकरवर तुतीची लागवड झाली असून जिल्ह्यात रेशीम उद्योगासाठी लागणाऱ्या कोषांचे उत्पादन चांगल्या प्रकारे होते. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेशीम पासून धागा बनविण्याचे प्रकल्प जिल्ह्यात असून ते सद्य:स्थितीत बंद अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा बंद प्रकल्प सुरु करून शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी व याच बरोबर धाग्यापासून कपडा तयार करण्याचा प्रकल्प उभारणीसाठी शासन स्तरावरुन कोणते प्रयत्न व उपाययोजना सुरु केल्या आहेत,

(४) असल्यास, त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१२-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) व (४) उस्मानाबाद येथील खासगी स्थानिक संस्थेला हा प्रकल्प मंजूर करण्यात आला असून त्यासाठी केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्य शासनाने रु.३० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तथापि खेळत्या भांडवलाअभावी हे युनिट २ वर्षे चालल्यानंतर बंद पडले

आहे. संस्थेने प्रकल्प सुरु करण्यासाठी रेशीम संचालनालयामार्फत पाठपुरावा करण्यात आला व येत आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात धाग्यापासून कापड तयार करण्यासाठी कोणताही प्रकल्प उभारण्याचा सद्य:स्थितीत शासनाचा विचार नाही.
(५) विलंब झालेला नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.